PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Dhakati Soon
Year: 1986

Song: Fasalis Sang Pori
Lyricist: Sudhir Moghe

फसलीस सांग पोरी तू गं कशी
तू गं कशी
तुझ्या पतंगाची दोरी कटली जशी
तुझ्या पतंगाची दोरी कटली जशी
हे हे... फसलीस सांग पोरी तू गं कशी
तू गं कशी
तुझ्या पतंगाची दोरी कटली जशी
तुझ्या पतंगाची दोरी कटली जशी

रूपाच्याच तोऱ्यामधे होतीस तू
होतास तू रे होतास तू
अं... आपल्याच मस्ती मध्ये होतास तू
अं हं होतीस तू गं होतीस तू
तुझा तोरा माझी मस्ती
तुझा तोरा माझी मस्ती
अशी गेली कशी
तुझा तोरा माझी मस्ती
अशी गेली कशी
अरे तुझ्या पतंगाची दोरी कटली जशी
तुझ्या पतंगाची दोरी कटली जशी

नादी लावायाचा होता छंद तुझा
छंद तुझा रे छंद तुझा
हो मागं मागं फिरायचा नाद तुझा
नाद तुझा गं नाद तुझा

खोड तुझी हौस माझी
खोड तुझी हौस माझी
अशी फिटली कशी
खोड तुझी हौस माझी
अशी फिटली कशी
आगं तुझ्या पतंगाची दोरी कटली जशी
तुझ्या पतंगाची दोरी कटली जशी

कोणी कोणा जिंकीयलं
हरलं गं कोण
सावज कोण आणि पारधी कोण
सांग कोणी कोणा जिंकीयलं
हरलं गं कोण
सावज कोण आणि पारधी कोण
गवसलो एकामेका
गवसलो एकामेका
कसे जाळ्यानिशी
गवसलो एकामेका
कसे जाळ्यानिशी
पतंगाची दोरी अशी कटली जशी
पतंगाची दोरी अशी कटली जशी
फसलीस सांग पोरी तू गं कशी
तू गं कशी
तुझ्या पतंगाची दोरी कटली जशी
तुझ्या पतंगाची दोरी कटली जशी

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*